शाआमज/शल्य/ जा.क्र 219

शल्यतंत्र विभाग

दि.१०/१०/२०२५

प्रती.

मा. अधिष्ठाता.

शा.आ.म.व रु.

जळगांव.

**विषय:- विशेष रक्तमोक्षण शिबिराचा अहवाल सादर करणे बाबत..**

मा.महोदय,

वरील विषयास अनुसरून आपल्या शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय जळगांव येथे शल्यतंत्र विभागा मार्फत विशेष रक्तमोक्षण चिकित्सा शिबीर दिनांक ०७/१०/२०२५ ते ०९/१०/२०२५ पर्यंत आयोजित करण्यात आले. आज दिनांक ०७/१०/२०२५ ला विशेष रक्तमोक्षण शिबिराचे उद्घाटन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता आदरणीय डॉ.नागनाथ गंगासागरे सरांनी केले. शल्य विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. निलेश थोरात यांनी सूत्र संचालन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मार्गदर्शन शल्य विभागाच्या प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ.सीमा गिरी यांनी केले. शरद ऋतूतील रक्तमोक्षनाचे महत्व, फायदे व त्याच प्रमाणे कोणत्या व्याधीत रक्तमोक्षन करावे याचे मार्गदर्शन केले. आदरणीय अधिष्ठाता डॉ. नागनाथ गंगासागरे सरांनी रक्तमोक्षन शोधनामुळे काय फायदे होतात व रक्तमोक्षन करतांना काय काळजी घ्यावी या बद्दल मार्गदर्शन केले. शिबिरासाठी अगतंत्र विभाग प्रमुख डॉ. अगतराव औघडे सर, रसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मडावी सर, डॉ. धकाते सर, डॉ. डोंगरे मॅडम, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. चौधरी सर उपस्थीत होते. मेडीकल सुप्रीडेंट डॉ. अश्विनी निर्मळे मॅडम व मेडीकल ऑफिसर डॉ. शितल सोगे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाला पंचक्रोशितील रूग्ण उपस्थीत होते. आंतरवासिय प्रशिक्षाणार्थी कु. ईशा दारोडे हीने धन्वंतरी स्तवन केले. रोगोळी आंतरवासिय प्रशिक्षणार्थी कु. राजेश्वरी फुके, कु. पुजा दुसेजा, कु. पुनम देवकाते, कु. वैभवी धुमाळ यांनी काढली. या शिबिरासाठी मेट्रन, सर्व सिस्टर्स, ब्रदर्स, व आंतरवासिय विध्यार्थी उपस्थीत होते. तसेच विशेष सहकार्य समाधान पवार यांचे लाभले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. शितल सोगे यांनी केले. या शिबिरात जलौकाचरणचे २१, सिरावेधनचे ११ व Cupping चे ५ असे एकुण ३७ रूग्णांनी लाभ घेतला. या शिबिराला विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांचे सहकार्य लाभले.

सोबत कार्यक्रमाचे छायाचित्र जोडत आहे.

आपल्या माहीस्तव सादर

(डॉ. सीमा गिरी)

विभागप्रमुख

शल्यतंत्र विभाग

शा.आ.म.व रु. जळगांव


रक्तमोक्षण
शिबिर
महाविद्यालय


MSW
office
Bill


office
Bill
MSW















GOVT OF MAHARASHTRA